देशोन्नती

# दुधाळ गायींची निवड आणि व्यवस्थापन

व्यवस्थापन



गायीची दुध उत्पादनक्षमता ही अनुवांशिक असते. उत्तम अनुवांशिक गुणधर्म असलेल्या गायी निवडणे हे किफायतशीर दुग्धोत्पादनासाठी आवश्यक आहे. गायीच्या वंशावळीची नोंद ही फक्त संशोधन प्रकल्पावर ठेवली जाते. शेतकऱ्याकडे मात्र तशा प्रकारची नोंद असतेच असे नाही. त्यामुळे बाजारामध्ये मिळणाऱ्या जनावरांची निवड, शक्यतो गायीच्या शरीर रचनेच्या साह्यानेच खालील दिलेल्या मुद्द्यांचा विचार करूनच करावी.

दुधाळ गाय आकाराने मोठी व शरीराचा बांधा व्यवस्थित असावा कारण वयस्कर गायींचे आकारमान मोठे असते व बांधा सैल असतो . गायीच्या अंगावर जास्त चरबी नसावी म्हणजे त्या स्थूल नसाव्यात.त्वचा मऊ व तजेलदार असावी.मन लांब व सडपातळ असावी. पाठीचा कणा सरळ व बरगड्या चापट्या आणि रुंद असाव्यात. कमरेची हाडे रुंद व दनगट असावीत तसेच मांडया पातळ, अर्ध गोलाकार असाव्यात. गाय शांत स्वभावाची असावी आणि डोके पुरेसे लांब व मजबूत असावे. डोळे पाणीदार, छाती भरदार व रुंद असावी. नाकपुड्या रुंद असाव्यात. चारही सड सारख्या लांबीची असावीत. कस शरीराला घट्ट व मऊ असावी. जनावरे निवडताना दुसर्या वेताची निवडावीत.

**दुधाळ गायींचे व्यवस्थापन करताना घ्यावयाची काळजी**

गाय व्याल्यानंतर प्रथम तिचा मागचा भाग गरम पाण्याने धुऊन घ्यावा. उर्जा भरून काढण्यासाठी १ आठवडा दररोज ३ किलो उकडलेली बाजरी, ५०० ग्रॅमगुळ, १०० ग्रॅम शोप, २०० मिलि गोडेतेल व ५० ग्रॅम सुंठ मिसळून द्यावे. गायीचा जर ७ तासांमध्ये पडेल आणि जर पडला नाही तर पशुवैध्याच्या मदतीने काढावा. २१ दिवसांत्र गाय पूर्ण क्षमतेने दुध देईल. तिच्या दुधाच्या प्रमाणानुसार तिला आहार द्यावा. गायीला दिवसातून एक वेळा स्वच्छ धुवावे. गाय व्याल्यानंतर ६० ते ६५ दिवसांत्र माजावर आल्यावर पशुवैद्यकाच्या साह्याने कृत्रीम रेतन करून घ्यावे. गायीचा गोठा स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. गोठा स्वच्छ राहण्यासाठी हवा खेळती राहील याची काळजी करावी. गायीला दिवसातून ३ वेळा पाणी पाजावे आणि चारा वेळच्या वेळी द्यावा. गायी गाभण राहिल्यानंतर तिला सातव्या महिन्यामध्ये आटवावे. गायी गाभण राहिल्यानंतर सातव्या महिन्यापर्यंत तिला १.५ ते २ किलो पर्यंत खुराक द्यावे आणि आठव्या नि नवव्या महिन्यामध्ये २.५ किलो पर्यंत खुराक द्यावे जेणेकरून दुध आणि वासराची वाढ होण्यासाठी मदत होईल. आटवल्यानंतर प्रत्येक सदमध्ये पेन्डेस्ट्रीनच्या ट्युबा सोडाव्यात. गाय व्याल्यानंतर तिला नियमित हिरवा व वाळलेला चारा तसेच दररोज २ किलो खुराक व ४० गरम खनिज मिश्रण ध्यावे. गाय विण्यापूर्वी आठ दिवस इतर जनावरांपासून वेगळे ठेवावे व विन्यापार्यंत तिच्याकडे लक्ष ध्यावे.

गाय विकत घेताना अगर निवडताना तिचे दुध २-३ वेळा काढून उत्पादनाची खात्री करून घ्यावी. केवळ मोठया आकाराची कास याबाबतीत गृहीत धरू नये. गाईला पान्हावयास किती वेळ लागतो ? आंबोणशिवाय धार देते का ? किंवा नाही ? तिला ठराविक गवळ्याची सवय आहे का ? या गोष्टींचीही खात्री करून घ्यावी.

तापट स्वभावाच्या गाई, उत्तेजित झाल्या, कि पान्हा चोरतात म्हणून शांत स्वभावाची गाय निवडावी. धारेच्या वेळी लाथा मारणारी, चीर्गुत, दगड आणि विटा चघळण्याची सवय असणारी गाय घेणं टाळाव.

गाय विकत घेताना शक्यतो दुसऱ्या वेतातील गाय निवडावी. जातिवंत दुधाळ गाई तरतरीत आणि निरोगी दिसतात. त्यांचे डोळे पाणीदार असतात. सर्व अवयवांची ठेवण प्रमाणबद्ध असते. शरीराचा आकार वरून, पुढून आणि बाजूकडून निरीक्षण केलं असता पाचरीप्रमाणे त्रिकोणाकृती दिसतो. गाईकड पुढून पाहिलं असता दोन पायातलं अंतर अधिक असाव.

छाती भरदार असावी. वरून पाहिलं असता कमरेची हाडं दूरवर असावीत. बाजूनं पाहिलं असता शेपटीवरील दोन हाडं आणि कास यामध्ये अधिक अंतर असावं. गाय लठ्ठ नसावी. लांब आणि सडपातळ असावी. पाठीचा कणा सरळ आणि मजबूत असावा. पाठीला बक असणाऱ्या गाई शक्यतो टाळाव्यात. गाईंच्या खुरांचा रंग काला असावा. वाढलेल्या नख्या किंवा खुरसडा याबाबतीत बारकाईने चौकसपणे बघावं. गाय विकत घेताना टी चालवून- फिरवून पहावी. कास हा दुभत्या जनावरांचा महत्वाचा अवयव. कासेची शरीराशी बांधणी घट्ट असावी.

**कु. ज्योती यमाजी मोटे,** सहाय्यक प्राध्यापक
मो.न. ८०८०६६५६५६ पशु विज्ञान व दुग्धशास्त्र विभाग
के.के.वाघ.कृषिमहाविद्यालय,नाशिक.
**डॉ.कल्पेश दि. मोरे** (सहाय्यक प्राध्यापक)
के.के.वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक.
**डॉ.श्रीकांत मोहन खुपसे,** सहाय्यक प्राध्यापक
एम जी एम नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय गांधेली, औरंगाबाद